# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मि

**दिनांकः 27.01.2022** **वारः गुरुवार**

---

**देशाच्या अनेक भागांमध्ये कोरोनाची रुग्ण संख्या वाढत असल्यामुळे, आम्ही श्रोत्यांना आवाहन करत आहो की त्यांनी दक्ष राहावं आणि संपूर्ण लसीकरण करुन घ्यावं तसंच 15 ते 18 वर्षे वयाच्या मुलांसह इतरांना लस घेण्यात मदत करावी. कोरोना विषाणूच्या ओमीक्रॉन या नवीन प्रकारामुळं चिंता निर्माण झाली असल्यानं मुखपट्टी, सुरक्षित अंतर आणि हात तसंच चेहऱ्याची स्वच्छता या तीन सोप्या उपायांचं पालन करावं. कोविडसंबंधी कोणतीही माहिती आणि मार्गदर्शनासाठी राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांक 011- 23 978 046 आणि 1075 या क्रमांकांवर संपर्क साधावा.**

---

1. 73वा प्रजासत्ताक दिन देशभरात उत्साहात साजरा; नवी दिल्लीतल्या राजपथावर भारताच्या लष्करी सामर्थ्याचं आणि सांस्कृतिक विविधतेचं मनोहारी दर्शन
2. संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन 31 जानेवारीपासून, 1 फेब्रुवारीला अर्थसंकल्प
3. पहिल्या भारत-मध्य आशिया शिखर बैठकीचं आयोजन
4. ड्रोनच्या वापरासंबंधी सुलभ प्रमाणपत्र योजना जाहीर आणि
5. महिलांच्या आशिया करंडक हॉकी स्पर्धेत दक्षिण कोरिया आणि जपान यांच्यात जेतेपदाची लढत

**प्रजासत्ताक दिन**

देशभरात काल 73 वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. नवी दिल्लीतल्या मुख्य समारंभात राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी ध्वजवंदनानंतर राजपथावर झालेल्या शानदार संचलनाची मानवंदना स्वीकारली. भारताच्या लष्करी सामर्थ्याचं आणि सांस्कृतिक विविधतेचं मनोहारी दर्शन राजपथावरील संचालानातून झालं. यावेळी जम्मू काश्मीर पोलिस दलाचे सहाय्यक उप निरीक्षक बाबू राम यांना अशोक चक्र पुरस्कार मरणोत्तर प्रदान करण्यात आला. 2020 मध्ये दहशतवाद्यांशी लढताना अतुलनीय शौर्य दाखवत बाबू राम यांनी 3 दहशतवाद्यांना ठार केलं होतं. राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांच्या कुटुंबियांनी हा पुरस्कार स्वीकारला.

मुख्य सोहळयापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय युद्ध स्मारकाला भेट देऊन हुतात्म्यांना आदरांजली वाहिली. यावर्षी संरक्षण मंत्रालयानं राजपथावरील संचलनासाठी काही नवीन कल्पना अमलात आणल्या. यात एरव्ही ज्यांना संचलन पाहणे शक्य होत नाही अशा लोकांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. रिक्षा चालक, बांधकाम मजूर, स्वच्छता कर्मचारी आणि आघाडीवरच्या कोविड योद्ध्यांना संचलन सोहोळयाचं विशेष निमंत्रण देण्यात आलं होतं.

राजपथावरील संचलनात सुरुवातीला लष्कराच्या सहा, नौदल आणि हवाई दलाच्या प्रत्येकी एक तसंच केंद्रिय सशस्त्र पोलिस दल, दिल्ली पोलिस, राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकांनी दिमाखदार संचलन केलं. लष्कराच्या दारुगोळा विभागाच्या पथकाचं नेतृत्व लेफ्टनंट मनिषा व्होरा या महिला अधिकाऱ्यानं केलं. सर्व पुरुष सदस्य असणाऱ्या पथकाचं नेतृत्व करणाऱ्या त्या पहिल्याच महिला अधिकारी ठरल्या.

सशस्त्र दलांच्या संचलनानंतर विविध राज्यं आणि मंत्रालयांच्या चित्ररथांनी राजपथावर सांस्कृतिक विविधता आणि विकासाचं दर्शन घडवलं. यात महाराष्ट्रातली जैवविविधता, कर्नाटकची पारंपरिक हस्तकला, गोव्याचं सास्कृतिक जीवन, पंजाबचं स्वातंत्र्यातील योगदान, उत्तर प्रदेशचं काशी विश्वनाथ धाम, हरियाणातील क्रीडाविश्व, जल जीवन मिशनमुळे बदललेलं ग्रामीण जीवन इत्यादींचा समावेश होता. अखेरीस हवाई दलाची 75 लढाऊ विमानं आणि हेलिकॉप्टर्सनी चित्तथरारक कसरती केल्या.

**सर्वपक्षीय बैठक**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं कामकाज सुरळीत पार पडावं म्हणून केंद्र सरकारनं येत्या 31 तारखेला सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संसदीय कार्यमंत्री प्रल्हाद जोशी यांनी ही बैठक बोलावली असून बैठक दुरदृश्य प्रणालीद्वारे होईल. राज्यसभा आणि लोकसभेतल्या राजकीय पक्षांच्या मुख्य नेत्यांना या बैठकीचं आमंत्रण आहे. संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन त्याच दिवशी सुरू होणार असून सकाळी 11 वाजता राष्ट्रपती रामनाथ कोविंद संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर अभिभाषण करतील अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आपल्या ट्विटर संदेशाद्वारे दिली आहे. अर्थ मंत्री निर्मला सीतारामन 1 फेब्रुवारीला केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतील.

कोविड प्रतिबंधक नियमांचं पालन करण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज पाळयांमध्ये होईल अशी माहितीही जोशी यांनी दिली. राज्यसभेचं काम सकाळी 10 ते दुपारी 2 या वेळेत तर लोकसभेचं काम दुपारी 4 ते रात्री 9 या वेळेत असेल.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला भाग पुढील महिन्याच्या 11 तारखेपर्यंत चालणार आहे आणि महिनाभराच्या विश्रांतीनंतर अधिवेशनाचा दुसरा भाग 14 मार्च पासून सुरू होऊन तो 8 एप्रिल रोजी संपेल.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज भारत-मध्य आशिया शिखर परिषदेच्या पहिल्या बैठकीचं दुरदृश्य प्रणालीद्वारे आयोजन करणार आहेत. कझाकिस्तान, किर्गिझ प्रजासत्ताक, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान आणि उझबेकिस्तानचे अध्यक्ष यात सहभागी होणार आहेत. 2015 मध्ये मोदी यांनी सर्व मध्य आशियायी देशांना ऐतिहासिक भेट दिली होती. त्यानंतर द्विपक्षीय आणि बहुपक्षीय मंचावर उच्च स्तरावर चर्चा तसंच देवाणघेवाण झाली आहे. ही शिखर परिषद म्हणजे भारत आणि मध्य आशियायी देशांच्या नेत्यांनी सर्वसमावेशक आणि चिरस्थायी भागीदारीला दिलेल्या महत्वाचं प्रतिक आहे असं आमच्या वार्ताहरांनी म्हटलं आहे.

**नाणेनिधी**

आगामी 2022-23 या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर 9 टक्के राहील, असं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं म्हटलं आहे. नाणेनिधीनं जागतिक अर्थव्यवस्थांकडे दृष्टीक्षेप या आपल्या ताज्या अहवालात हा अंदाज वर्तवला आहे. बँकांद्वारे दिल्या जाणाऱ्या अर्थ पुरवठ्याबाबतच्या सुविधा, त्याबद्दल वाढत असलेला विश्वास, अर्थपुरवठ्याचा केला जात असलेला वापर आणि वाढती गुंतवणूक यामुळे विकासदर वाढण्याच्या मोठ्या शक्यता निर्माण झाल्याचं नाणेनिधीनं म्हटलं आहे. भारतातील आर्थिक क्षेत्राची कामगिरी अपेक्षेपेक्षा चांगली झाल्याचं या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. जागतिक अर्थव्यवस्थेचा विकास दर 2021 मध्ये 5 पूर्णांक 9 दशांश टक्के होता, तो 2022 मध्ये 4 पूर्णांक 4 दशांश टक्के राहील. तसंच अमेरिका आणि चीन या दोन बलाढ्य अर्थव्यवस्थांना उतरत्या स्थितीला सामोरे जावे लागेल, असंही या अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

**ड्रोन**

ड्रोनचं प्रमाणीकरण सोपं, वेगवान आणि पारदर्शक करण्यासाठी सरकारनं ड्रोन प्रमाणपत्र योजना अधिसूचित केली आहे. सुविधाजनक केलेले ड्रोन नियम, हवाई क्षेत्राचा नकाशा, पी आय एल योजना आणि सिंगल विंडो डिजिटल स्काय प्लॅटफॉर्म यासह भारतातल्या ड्रोन उत्पादनाला मदत होईल असं नागरी हवाई वाहतूक मंत्रालयानं आपल्या ट्विटर संदेशात म्हटलं आहे. 2030 पर्यंत भारताला जगाचं ड्रोन संकुल बनवण्याच्या दृष्टीनं हे आणखी एक पाउल आहे असंही मंत्रालयानं म्हटलं आहे. वापरकर्त्यांना त्यांचे ड्रोन, चालक आणि मालक यांच्यासाठी एक वेळची नोंदणी पूर्ण करणं अत्यावश्यक आहे. वापरकर्त्यांना पिवळया किंवा लाल क्षेत्रामध्ये जाण्याची इच्छा असेल तर प्रत्येक उड्डाणासाठी संकेतस्थळावरून परवानगी घेणं गरजेचं आहे.

**रेल्वे परीक्षा**

भारतीय रेल्वेनं आपल्या अतांत्रिक श्रेणी आणि केंद्रीय रोजगार अधिसूचनेची पहिली पायरी अर्थात संगणकावर आधारित चाचणी पुढे ढकलली आहे. या महिन्याच्या 14-15 तारखेला रेल्वे भरती मंडळानं जारी केलेल्या अतांत्रिक श्रेणीच्या पहिल्या टप्प्यातल्या निकालासंदर्भात उमेदवारांनी उपस्थित केलेल्या चिंता आणि शंकांची चौकशी करण्यासाठी उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली आहे.

**भाजप गोवा**

गोवा विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं 6 उमेदवारांची आपली दुसरी यादी जाहीर केली आहे. यादीत समावेश असलेल्यांमध्ये राजेश तुळशीदार पाटणेकर हे बिचोलिम विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत, अँटोनियो फर्नांडिस सेंट क्रुझ मतदारसंघातून तर जनिता पांडुरंग मडकईकर यांना राज्यातील कुंबरजुआ मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपाच्या केंद्रीय निवडणूक समितीनं ही नावं निश्चित केली आहेत.

**उत्तरप्रदेश**

दरम्यान, उत्तरप्रदेशात विधानसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्यास आपासून अधिसूचना जारी करून सुरुवात होणार आहे. राज्यात 10 फेब्रुवारी ते 7 मार्च या काळात सात टप्प्यात मतदान होणार आहे. चौथ्या टप्प्याचं मतदान 23 फेब्रुवारीला 9 जिल्ह्यातल्या 59 विधानसभा मतदारसंघांमध्ये होणार आहे. पहिल्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्ज मागे घेण्याचाही आज शेवटचा दिवस आहे. पहिल्या टप्प्याचं मतदान 58 विधानसभा मतदारसंघात होणार असून 10 फेब्रुवारी रोजी पार पडणार आहे.

**हॉकी**

हॉकीच्या महिला आशिया चषक स्पर्धेत दक्षिण कोरिया आणि जपान यांनी ओमानच्या मस्कत इथं आपापल्या उपांत्य फेरीत विजय नोंदवल्यावर विजेतेपदाची लढत निश्चित केली. मस्कतमधल्या सुलतान काबूस संकुलात काल संध्याकाळी झालेल्या पहिल्या उपांत्य लढतीत दक्षिण कोरियानं गतविजेत्या भारतावर 3-2 अशी मात केली. दुसऱ्या उपांत्य फेरीत जपाननं चीन विरुद्ध पिछाडीवरून पुढे येत 2-1 असा विजय मिळवला. भारत आणि चीन दरम्यान उद्या तिसऱ्या आणि-चौथ्या स्थानासाठी सामना होईल तर दक्षिण कोरिया आणि जपान यांच्यादरम्यान होणारा अंतिम सामना उद्याच रंगणार आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.